| MHAH070009262025 | फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३४/२०२५ आदेश नि.१<br>निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स वि.महाराष्ट्र सरकार |
|---|---|

१. संगमनेर तालुका पोलीस ठाण्याचा गुन्हा रजि.क्र.२५१/२०२५ मधील जप्त मुद्देमाल हुंदाई ऑरा चार चाकी क्र. MH-12-XM-2493 चा ताबा मिळण्याकरीता निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स तर्फे अक्षय पवार यांनी दिलेला अर्ज वाचला.

२. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री.पी.बी.वाघ यांनी दिलेले नि.७ चे लेखी उत्तर वाचले.

३. उभय पक्षकारांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

४. नि.३ चे यादीसोबतचे मुळवरुन पडताळलेले वाहन नोंदणीचे स्मार्टकार्ड वाचले असता असे निदर्शनास येते की, अर्जदार निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स हे जप्त मुद्देमाल ऑरा गाडी क्र. MH-12-XM-2493 इंजिन क्र. G4LARM190632 चेसीस क्र. MALB241CLRM328843 चे नोंदणीकृत मालक आहेत. सदर वाहनाचा दि.०३.०१.२०२५ ते ०२.०१.२०२६ याकालावधीचा विमा नि.९ चे यादीसोबत दाखल आहे.

५. नि.१० चे अर्जदाराचे प्रतिज्ञालेखात असे नमुद आहे की, उपरोक्त नमुद वर्णनाची ऑरा गाडी ही अर्जदाराचे मालकीची आहे. सदर गाडीवर आरोपी ड्रायव्हर म्हणून होता. घटनेच्या दिवशी आरोपीने सदर गाडी वैयक्तिक कामाकरीता नेलेली होती. सदर गाडी गुन्हयात वापरली असल्यामुळे पोलीस ठाणेला जमा करा असे संगमनेर तालुका पोलीस ठाणे यांनी सांगितल्याने सदर गाडी अर्जदाराने पोलीस ठाणेला जमा केली.

६. गुन्हा रजि.क्र. २५१/२०२५ चा तपास पुर्ण होवून दोषारोपपत्र दाखल

होवून त्या खटल्याचा न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागेल. इतका कालावधी उपरोक्त नमुद वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे वापराअभावी नुकसान होईल. तसेच खटल्याचा न्यायनिर्णय होईपावेतो ते वाहन सांभाळण्याची अनावश्यक जबाबदारी संगमनेर तालुका पोलीसांना घ्यावी लागेल. त्यामुळे अटी व शर्तींना अधीन सदर वाहनाचा ताबा अर्जदार निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स तर्फे अक्षय पवार यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४९७ व ५०३ च्या तरतुदीनुसार देण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल. सबब आदेश.

## आदेश

अ. फौजदारी चौकशी अर्ज क्र.३४/२०२५ मान्य केला आहे.

ब. रक्कम रुपये ५,००,०००/- चे क्षतीपूर्ती बंधपत्र (indemnity bond) अर्जदार निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स तर्फे अक्षय बाळासाहेब पवार यांचेकडून स्वीकारुन सदर ऑरा चारचाकी गाडी क्र. MH-12-XM-2493 इंजिन क्र. G4LARM190632 चेसीस क्र. MALB241CLRM328843 चा ताबा खालील नमुद अटी व शर्तींना अधीन अर्जदार अक्षय बाळासाहेब पवार यांना देण्यात यावा.

## अटी

i. गुन्हा रजि.क्र. २५१/२०२५ चे संबंधीत खटल्याचा न्यायनिर्णय होईपावेतो अर्जदार निरझरा टुरिस्ट ॲण्ड ट्रॅव्हल्स तर्फे अक्षय बाळासाहेब पवार यांनी उपरोक्त नमुद वाहनामध्ये कोणत्याही स्वरुपाचा फेरबदल करु नये, त्याची विक्री अथवा कसल्याही प्रकारचे हस्तांतरण करु नये.

ii. न्यायालय आदेश करेल तेंव्हा अर्जदाराने सदर वाहन न्यायालय अथवा पोलीसांसमोर सादर करावे.

iii. सदर वाहनाचा कोणत्याही गुन्हयासाठी वापर होणार नाही याची हमी दयावी.

क. गुन्हा रजि.क्र. २५१/२०२५ चे तपासी अधिकारी अथवा संगमनेर तालुका पोलीस निरीक्षक यांनी सदर वाहनाची रंगीत छायाचित्रे अर्जदाराच्या खर्चाने काढून घ्यावीत व ती गुन्हा रजि.क्र. २५१/२०२५ चे दोषारोपपत्रासोबत दाखल करावीत.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR

Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.10.17 15:43:51 +0530

संगमनेर ( मंदार नेरलेकर )

दिनांक –१७/१०/२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश,

संगमनेर.